**प्रेस नोट** **दिनांक-३०/०७/२०२६**

**पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ-२, मुंबई**
**मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई**

**''बनावट लेटरहेड तयार करून त्यावर खोटा मजकूर लिहून रेल्वे तिकीट व्ही.आय.पी. कोट्यातून मिळवून देणाऱ्या आंतरराज्यीय टोळीस अटक केलेबाबत''**

मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई येथे रेल्वे प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार, लोकभवन कार्यालयाच्या नावाने बनावट लेटरहेड तयार करून त्यावर बनावट स्वाक्षऱ्या, बनावट शिक्के व खोटा मजकूर वापरून रेल्वेच्या व्ही.आय.पी. कोट्यातून तिकीटे मिळविण्याचा गैरप्रकार उघडकीस आला. या प्रकरणी मलबार हिल पोलीस ठाणे येथे **गु.र.क्र.-७०/२०२६ कलम ३१८(२), ३३६(३), ३३६(४), ३३७, ३४०(२), २०४ भारतीय न्याय संहिता, २०२३** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा सखोल तांत्रिक तपास करून आरोपींचा मागोवा घेण्यात आला. बनावट लेटरहेड तसेच इतर बनावट साहित्य तयार करून त्याचा वापर करणाऱ्या आरोपींचा उत्तर प्रदेश, गुजरात तसेच मुंबई परिसरात शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली.

**१) अमरीश ईश्वरलाल ठक्कर, वय -४१ वर्षे (मुख्य सूत्रधार)**
**२) तारीक मेहफूज खान, वय ३३ वर्षे**
**३) दीपककुमार कन्हैयालाल यादव, वय २७ वर्षे**
**४) विनय विक्रमसिंग रावत, वय २४ वर्षे**
**५) सागर ईश्वरलाल ठक्कर, वय ३२ वर्षे**
**६) क्षत्रुंजय रामकुमार यादव उर्फ अनुप उर्फ मोहन, वय ३४ वर्षे**

**तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, मुख्य आरोपीविरुद्ध यापूर्वीही कुर्ला तसेच मुंबई सेंट्रल रेल्वे पोलीस ठाणे येथे अशा स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.**

अटक आरोपींकडून १२ मोबाईल फोन, १ लॅपटॉप, १६ सिम कार्ड, ७० क्रेडिट/डेबिट कार्ड, ४०० हून अधिक व्यक्तींच्या व्ही.आय.पी. रेल्वे बुकिंग संदर्भातील गोपनीय माहितीचा डेटाबेस, २ बनावट शिक्के, ५ आधार कार्ड, २ स्टॅम्प पॅड इत्यादी मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

ही कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा. अपर पोलीस आयुक्त श्री. शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर. (दक्षिण परिमंडळ-२) तसेच मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. सुमन चव्हाण (गावदेवी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर गोरवे, पोलीस निरीक्षक दिगंबर बिडवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजित चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक इंद्रजित मोहिते, पोलीस उपनिरीक्षक अक्षय चौगुले, पोलीस हवालदार गुलाबखान पठाण, पोलीस हवालदार संतोष लोखंडे, पोलीस हवालदार राजेश सरवदे, पोलीस हवालदार रामेश्वर माचेवाड, पोलीस शिपाई सचिन चतुर, पोलीस शिपाई आशिष घोरपडे, पोलीस शिपाई सत्यवान राऊत, पोलीस शिपाई समीर भालेराव व पोलीस शिपाई जगदेव यांनी उत्कृष्ट तपास करून यशस्वीरीत्या पार पाडली.